ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

# ग्रामीण एकल महिलांची स्थिती : वेल्हे तालुका, जिल्हा पुणे येथील महिलांचा अभ्यास

**श्रीमती बागेश्री पोंक्षे**

*प्रकल्प समन्वयक*

**श्रीमती आशा सुर्वे**

*एकल महिला प्रकल्प प्रमुख*

*ज्ञान प्रबोधिनी, पुणे*

*ईमेल आयडी: bageshree.ponkshe@jnanprabodhini.org*

**गोषवारा**

*इथे 'एकल' महिला म्हणजे जी नवऱ्याशिवाय एकटी जगते आहे अशी . ती घटस्फोटिता, परित्यक्ता किंवा विधवा स्त्री असू शकते. तिला मूल असेल किंवा नसेल. त्यातही लेखकांच्या मते ग्रामीण भागातील एकल महिलेची स्थिती हि अजूनच दु:खद असू शकते. तिच्या अन्य शहरी मैत्रिणींपेक्षा तिला जास्ती कष्ट आणि अपेष्टा सोसाव्या लागतातच, शिवाय ती तिच्या कुटुंबातील व्यक्तींसमोरही मोकळेपणाने व्यक्त होऊ शकत नाही, स्वत:च्या अडचणी मांडू शकत नाही. बऱ्याचदा त्यातील बहुतेकजणी या सरकारला 'दिसत' नसतात. ( Visible) जसे कि त्यांचे नाव रेशन कार्डावर नसते. त्यामुळे त्या त्याच्या नातेवाईकांच्या दयेवर अवलंबून राहावे लागते आणि म्हणून त्यांचे फुकटचा नोकर असल्याप्रमाणे शोषण होत राहण्याची शक्यताच अधिक असते. हे सगळे लक्षात आल्यामुळे आम्ही त्यांच्यासाठी बचत गटाचे व्यासपीठ उपलब्ध केले आणि त्यांच्या प्रश्नांवर काम करायला सुरुवात केली.*

**महत्त्वाचे शब्द :** *ग्रामीण, एकल महिला, सरकारी योजना, स्वयं साहायता समूहांचे व्यासपीठ.*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

## प्रास्ताविक

'एकल महिला म्हणजे नवऱ्या शिवाय जगणाऱ्या महिला. ती मुलासह किंवा शिवाय राहणारी घटस्फोटिता, परित्यक्ता किंवा विधवा असू शकते. २०११ सालच्या जनगणनेनुसार भारतात ५ कोटींपेक्षा जास्ती एकल महिला आहेत, पैकी ८५% या सर्व वयोगटातील विधवा आहेत. हा आकडा भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ४% किंवा एकूण महिलांच्या लोकसंख्येच्या ८% आहे. एकल महिलेला एकल असल्यामुळे अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागते. भारतात मोठ्या संख्येचा गरिबीचा प्रश्न आहे. आणि ती महिला गरीब असेल आणि एकल असेल तर तिला अजूनच भीषण परिस्थितीला तोंड द्यावे लागते. गरीब नसेल आणि एकल असेल तरी तिची परिस्थिती बिकट असते. वर बघितल्याप्रमाणे एकल महिलांचे एकूण प्रमाण एव्हढे मोठे असूनही तिच्या प्रश्नांवर संशोधन झालेले दिसत नाही किंवा सरकारी धोरणांमध्ये तिचा विचार झालेला दिसत नाही.

एकल महिलांमध्ये ग्रामीण एकल महिला आणि शहरी एकल महिला असे दोन गट पडतात. शहरी एकल महिलेलाही अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते, पण ग्रामीण भागातील एकल महिला हि कोणाच्याही मोजणीतच येत नाही. तिला अस्तित्वच नाही. ती दिसत नाही. आपल्या समाजात

ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

एकल महिला हि जवळजवळ अदृश्य असा भाग आहे. या सगळयाजणी ह्या कोणत्याना कोणत्या सामाजिक/जातीच्या/धर्माच्या/व्यवसायाच्या गटाच्या परिप्रेक्षात बघितल्या जातात. आपण त्यांना त्या संदर्भासह किंवा त्या कुटुंबाच्या संदर्भात ओळखतो पण त्यांना स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व नसते.

एकल महिलांना जन मानसात आणि सरकारी धोरण तसेच कायद्यात काहीही स्थान नाही. जसे कि आता आता केरळ हाय कोर्टाचा एक निकाल येई पर्यंतच्या काळात, परित्यक्ता महिलेच्या मुलाला परदेशात जाण्यासाठी पासपोर्ट काढायचा असेल तर तिच्या नवऱ्याची संमती आणावी लागत होती. भारतात विविध समाजाच्या जातीच्या संघटना किंवा त्यांच्यासाठी काम करणारे गट आहेत. महिलांसाठी काम करणारेही गट आहेत, पण एकल महिलांसाठी काम करणाऱ्या, एकल महिलांना त्यांच्या स्वतःच्या वाटतील अशा संस्था नाहीत. फक्त एकल महिलांसाठीच काम करणारी स्वयंसेवी संस्थादेखील नाहीत. संजय गांधी निराधार योजनेसारख्या काही योजना राज्य केंद्र सरकारच्या वतीने चालवल्या जातात. बहुतांश एकल महिलांना या योजना माहित नाहीत आणि त्यासाठी करावयाच्या अर्जाची पद्धती, लागणारी कागदपत्रेही माहित नाहीत.

भारतातील एकल महिलेची स्थिती खूप वेदनादायी आहे. त्यांच्याकडे सुरक्षित असे उत्पन्नाचे साधन नाही. कुटुंबामधील त्यांच्या न्याय्य वारसाहक्कापासूनही त्यांना वंचित ठेवले जाते. त्यांना एव्हढ्या कष्टाला आणि अन्यायाला सामोरे जावे लागते, प्रसंगी छळ होतो तरी त्यांना एव्हढे असुरक्षित वाटते कि त्या त्यांच्या कुटुंबात या कशाचाही उच्चारही करू शकत नाहीत. मग ते सासर असो कि माहेर.

सरकार आणि स्वयंसेवी संस्थाना देखील त्या दिसत नाहीत. खरेतर संस्था आणि सरकार यांनी त्यांच्या पाठीशी उभे राहायला पाहिजे पण ते तोंड फिरवतात. त्यांना कोणाचाही पाठींबा नसतो. समाजातील त्यांच्या बाजूने उभे राहणारे कोणीही नसते. इतके कि रेशन कार्डावरही त्यांचे नाव दिसत नाही. त्या सर्वस्वी नातेवाईकांच्या दयेवर किंवा कृपेवर अवलंबून राहतात आणि परिणामतः त्यांना राबवून घेतले जाते. त्या घरांमध्ये राबत राहतात आणि त्यांचे शोषण होत राहाते.

गेल्या २५ वर्षांपासून ज्ञान प्रबोधिनी हि संस्था स्त्रियांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे म्हणून त्यांच्या छोट्या मोठ्या उद्योगांना मदतीचा हात देत आहे आणि स्त्री शक्ती प्रबोधनाचे काम करीत आहे. पण या २५ वर्षात ग्रामीण भागातील तळागाळाच्या महिलांपर्यंत पोहोचण्याच्या कामातही समाजाचे हे अंग अस्पर्श राहिले होते. समाजाच्या एकूण नियमांमुळे त्या कधीही विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी झाल्या नाहीत. हे अभिसरण अवघड गेले. बचत गटामधील त्यांचा सहभागही किमान राहिला कारण त्यांच्याकडे बचत नव्हती. त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांचे प्रबोधन होण्यासाठी त्यांना जाणून घेणे महत्वाचे आहे हे आमच्या लक्षात आले. त्यांना असे जाणून घेतले की पुढची पायरी येईल ती म्हणजे त्यांच्या सोबत छोटे छोटे उद्योग करण्यासाठी त्यांना मदत करणे . त्यामुळेच आम्ही आमच्या गटातील महिलांच्या मदतीने त्यांच्याशी संपर्क साधला आणि आज त्यांच्या प्रश्नांवर काम करीत आहोत. हेच आहे आमचे कृतीरूप संशोधन.

**उद्दिष्टे**

- पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्या मधील २५ गावांमध्ये एकल महिलांचा शोध घेणे.
- ज्ञान प्रबोधिनी या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून अशा महिलांसाठी एक व्यासपीठ उभे करणे व त्या माध्यमातून त्यांना मदत करणारा आश्वासन देणारा गट (support group) उभा करणे.
- बचत गटाच्या व्यासपिठाचा उपयोग करून वेळे तालुक्यातील १० गावांमधील निदान ५०% एकल महिलांना एकल महिलांसाठीच्या सरकारी योजनापर्यंत पोहोचवणे.

ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

**कृती संशोधनाची पद्धती**

या कृती संशोधनात सुरवातीला आमच्या बचत गटाच्या कार्यकर्त्यांनी गावातील अंगणवाडी ताईंच्या मदतीने त्या गावातील एकल महिलांची यादी केली. त्यानंतर भोर, वेल्हे आणि हवेली या तीन तालुक्यांच्या पातळीवर अश्या महिलांचे मेळावे आयोजित करून त्यांचे प्रश्न जाणून घेतले. त्यांना जिथे प्राधान्याने मदत हवी होती अश्या विषयांची यादी केली. या एकल महिलासाठी उपलब्ध असलेल्या सरकारी योजनांचा त्यांना परिचय व्हावा म्हणून स्वतंत्रपणे तिन्ही तालुका पातळीवर त्यांच्याशी चर्चा आयोजित केल्या. तालुका पातळीवर अशा सर्व योजनांसाठी भरायची कागदपत्रे आणि त्यांची पूर्तता करता यावी यासाठी एक मदत केंद्र सुरु केले. संबंधित सरकारी कार्यालयांमधून हि कागदपत्रे काळजीपूर्वक भरून सादर करण्यासाठी त्यांना मदत करण्यात आली.

**माहितीचा स्रोत**

५० गावांना भेटी देण्यात आल्या आणि त्यातील एकल महिलांची यादी करण्यात आली. ३ वेगवेगळ्या एकत्रीकरणा मधून आमच्याकडे अश्या २५० जणींची नोंद झाली.

**परिणाम**

जरी सुरवातीला ५० एकाल महिलांसाठी नियोजन केले होते तरी २५ वर्षांच्या त्या भागातील कामामुळे तयार झालेले संपर्काचे जाळे आणि त्या महिलांची दयनीय अवस्था यामुळे २५० महिलांपर्यंत संपर्क करण्यात आला व त्यांचे नाव या कामासाठी नोंदवण्यात आले. आमच्या असे लक्षात आले कि आम्ही गृहीत धरले होते त्यापेक्षाही त्यांचे प्रश्न हे खूप जटील आणि समाज मानसाच्या विविध अंगांना स्पर्श करणारे होते. उदा. एकल महिलेजवळ कोणतेही उत्पन्नाचे साधन नसते आणि त्यांच्या नावावर कोणतीही वस्तू, संपत्ती अथवा मालमत्ता नसते. समाजाच्या विरोधात जाऊन बोलण्याची त्याना हिम्मत नसते कारण त्यांना कोणाचाही पाठींबा नसतो. त्यांना मदतीची अपेक्षा असते पण कोणत्याही सरकारी यंत्रणांशी थेट संपर्क नको असतो. किंवा असा संपर्क करताना त्या स्वस्थ नसतात.

पहिल्या काही बैठकांनंतर एकूण ८४ एकल महिलांनी विविध सरकारी योजनांसाठी अर्ज दाखल केले. यातील ४५ जणींना संजय गांधी निराधार योजनेचा किंवा श्रावणबाळ योजनेचा लाभ झाला. यातून त्यांना १००० रुपये दरमहा मिळायला सुरवात झाली १० जणींना दारिद्र्य रेषेखालील महिलेला पतीच्या निधनानंतर जे एकरकमी विम्याचे पैसे मिळतात तसे प्रत्येकी रु. २०,०००/- मिळाले. आता या महिला छान मोकळेपणाने राहात आहेत. त्यांच्या नावाचे खाते आहे आणि त्यात डाळ तांदूळ येतील एव्हढे त्यांच्या नावाचे पैसे आहेत. त्या सर्व महिलांनी येऊन सांगितले कि आम्ही आता आमच्यासारख्या इतर ज्या आमच्या मैत्रिणी आहेत त्यांना आम्ही आमच्या अडचणी मोकळेपणाने सांगत आहोत. यामुळे मनावरचे मणामणाचे ओझे गेल्यासारखे वाटत आहे. ताण खूप कमी झाला आहे.

**महत्वाचे मुद्दे**

सन २०११ च्या जनगणने प्रमाणे, एकूण एकल महिलेच्या ६५% महिला या ग्रामीण एकल महिला आहेत. शहरी एकल महिलांच्या तुलनेत त्यांना जास्ती प्रश्नांना सामोरे जावे लागते. माध्यमांमधून किंवा अन्य संशोधनांमधून ज्या एकल महिलांचा उल्लेख होतो त्या बहुतांश वेळेस शहरी असतात आणि गरिबीचा प्रश्नही त्यांना तुलनेने कमी असतो. शहरी एकल महिलांमध्ये स्वच्छेने एकल राहिलेल्या महिलाही येतात. ग्रामीण भागात तसे वानगीदाखलही नाही. त्यामुळे विविध अभ्यासांमधून मांडल्या जाणाऱ्या एकल महिलेच्या प्रश्नांमध्ये ग्रामीण महिलेला येणाऱ्या रेशन कार्डावरील नाव, घर किंवा जमिनीवरील नाव अश्या प्रश्नांचा उल्लेख होत नाही.

ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

अनुभवामुळे असे वाटते आहे कि ग्रामीण एकल महिलेचे कोठेच प्रतिनिधित्व नाही याचे महत्वाचे कारण म्हणजे बाहेरून शहरातून आलेल्या मोठ्या मोठ्या एजन्सी त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत. त्यांच्या संपर्कात येत नाहीत, कारण एकल महिला या कोणत्याही सामाजिक आणि एकत्रीकरणाच्या कार्यक्रमाना उपस्थिती लावत नाहीत. आणि घराबाहेर कोणतेही काम करायला उत्सुक नसतात आणि जनगणने सारख्या सर्वसमावेशक सर्वेक्षणात त्या कोणत्यातरी समाजाचे, जातीचे,कुटुंबाचे, व्यवसायाचे प्रतिनिधित्व करतात. त्यांच्या विशिष्ट अशा एकलपणाच्या स्थितीचा त्यात काही संदर्भ येत नाही.

**कृती संशोधनाची पद्धती**

पुण्यातील ज्ञान प्रबोधिनी या स्वयंसेवी संस्थेच्या वतीने हे कृती संशोधन केले गेले. सर्व प्रथम आपल्याबचत गटाच्या कार्यकर्त्यांनी ४० गावांनी भेटी दिल्या आणि गावातील अंगणवाडीताई च्या मदतीने १९८ एकल महिलांची यादी केली. त्यांच्याशी संपर्क केला. त्यांचे २ गट करून मेळावे घेतले. यात त्या बोलल्या आणि त्यांचे प्रश्न त्यांनी मांडले. एका गटात ७२ आणि दुसर्या गटात १२६ महिला होत्या. त्यांना एक प्रश्नावली सोडवण्यासाठी दिली गेली. त्यांच्याशी मोकळ्या गप्पा देखील झाल्या. बऱ्याच जणी लिहू वाचू शकत नव्हत्या त्यांना कार्यकर्त्यांनी प्रश्न विचारले आणि लिहिण्यास मदत केली.

त्याच्याशी बोलताना त्यांची हलाखीची परिस्थिती लक्षात आली आणि असे वाटले कि राज्य किंवा केंद्र सरकारची एकल महिलांसाठीची जी योजना असते ती यांना मिळायला हवी . पण त्यातल्या कोणालाही ती मिळत नव्हती. त्यामुळे आम्ही नंतर एक सखोल असे सर्वेक्षण केले ज्यात अश्या प्रकारच्या योजना त्यांच्यापर्यंत न पोहोचण्यामागची कारणे कोणती आहेत ते समजले.

आणखी वेगळ्या १० गावांमधील ५२ जणींच्या आम्ही व्यक्तिश: वेगवेगळ्या अश्या मुलाखती घेतल्या आणि त्यांना या प्रश्नावलीतील प्रश्न विचारले. याप्रमाणे ५० गावे या कृती संशोधनात समाविष्ट झाली. त्यांना सरकारी योजनांचा फायदा व्हावा यासाठी तातडीच्या मदतीची गरज होती. पण कोणापर्यंत पोहोचायचे हे त्यांना कळत नव्हते. त्यामुळे सर्वेक्षण करता करताच आम्ही त्यांना अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि योजनेचा लाभ व्हावा म्हणून मदत करू लागलो. यामुळे खूप चांगले असे काम उभे राहिले आणि त्यातील बहुतांश महिलांना योजनेचा लाभ झाला.

**अ: प्राथमिक सर्वेक्षण**

२५ गावांमधील १९८ महिलांच्या सर्वेक्षणातील काही महत्वाच्या गोष्टी येथे देत आहे. ५-६ मोठी गावे सोडली तर जगण्याचे - उपजीविकेचे साधन हे शेती आणि घरातील एकाचे शहरातील स्थलांतर असेच आहे. यातील सर्वात लहान गावाची लोकसंख्या २५० आहे तर सर्वात मोठे गाव हे २२०० लोकसंख्येचे आहे. ( जन गणना २०११) येथे हे सांगण्याची गरज आहे कि या १९८ महिला या स्वतःहून तरी पुढे आल्या किंवा कार्यकर्त्यांनी समजून सांगितल्यावर आल्या. हे त्या ४० गावांमध्ये राहणाऱ्या सर्व महिलांचा नमुना नाहीत. (sample) तरीही या गावांतील सर्व समाजगटांचे समाधानकारक प्रतिनिधित्व त्यात आले आहे.

**टेबल क्र १ : एकल महिलांचे प्रकार**

| प्रकार | संख्या |
|---|---|
| विधवा | ११३ |
| परित्यक्ता | ३३ |
| कुमारिका | ६ |

ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

| | |
|---|---|
| घटस्फोटीत | ४ |
| प्रतिसाद नाही | ४२ |
| | १९८ |

- कुमारिका प्रकारातील जवळपास सगळ्या या दिव्यांग आहेत आणि हेच त्यांच्या एकल असण्याचे महत्वाचे कारण आहे.
- शेवटचा प्रकार हा दखल द्यावा असा आहे. ४२ महिला तरी अश्या होत्या ज्या एकल महिलांच्या मेळाव्याला तर आल्या होत्या पण त्यांनी फॉर्म भरताना आपण कुठल्या प्रकारात मोडतो हे सांगितले नव्हते. लिहिले नव्हते. स्थानिक कार्यकर्त्यांकडून आम्हाला असे समजले कि या परित्यक्ता होत्या पण आपल्याला असे सोडून दिलेले आहे किंवा आपला त्याग केला गेला आहे हे त्यांना उघडपणे सांगायचे नव्हते. म्हणजे वर ज्या ३३ जणींनी उघडपणे आपण परित्यक्ता आहोत असे म्हंटले होते, त्यात हि संख्या मिळवली तर आकडा ७५ पर्यंत जातो. २०० महिलांमधील ७५ महिला परित्यक्ता आहेत हे सत्य स्वीकारले तर ते समाजाच्या स्थितीवर प्रकाश टाकते. हा आकडा समाजातील असमानतेब्द्दल बोलतो.
- अशा सोडून दिलेल्या महिलांना खूप प्रश्नांना सामोरे जावे लागते असा आमचा अनुभव आहे. पण हा देखील अनुभव आहे, कि त्यांना सोडून जाणाऱ्या त्यांच्या नवऱ्यांना मात्र कोणत्याच सामाजिक प्रश्नांना सामोरे जावे लागत नाही.
  ( कदाचित त्यामुळेच सोडून दिलेल्या महिलांची संख्या जास्ती असेल.) ( यातील किती नवऱ्यांची पुन्हा लग्ने झाली आहेत हे देखील पहिले तर अजून वेगळे वास्तव समोर येईल. ते या अभ्यासात केले नाहीये.)
- आणखी महत्वाची संख्या हि विधवा महिलांची आहे.

**टेबल क्र २: गाववार एकल महिलांची संख्या**

| क्र | एकल महिला संख्या | गावांची संख्या |
|---|---|---|
| १ | १ ते १० | ३४ |
| २ | ११ ते २० | ५ |
| ३ | २१ ते ३० | १ |

गेल्या काही वर्षांपासून ज्या गावांमध्ये आम्ही काम करीत होतो त्या ५० गावांमधील एकल महिलांना आम्ही बोलावले होते. माहिती सांगितली होती. त्यातील काही गावांमध्ये आम्ही नव्याने सुरुवात केली होती. काही गावांमध्ये जुने काम होते आणि खूप चांगले असे कामाचे जाळे तयार झाले होते. या गोष्टीचाही परिणाम आम्हाला आमच्या मेळाव्यातील प्रतिसादांमध्ये जाणवला. १९ गावांमधून प्रत्येकी एक एकल महिला आली होती. तर एका गावातून २६ एकल महिला आल्या होत्या. ज्या गावातून २६ जनी आल्या होत्या ते गाव काही त्या १९ गावांमधील गावांपेक्षा फार मोठे नव्हते. ज्या गावात काम जास्ती काळ होते आणि आमच्यामध्ये विश्वासाचे नाते तयार झाले होते, त्या गावातून प्रतिसाद होता. कारण त्या चार जणात आमच्या विश्वासावर असे सांगू शकत होत्या कि त्या एकल आहेत. तसेच त्या गावातील महिला या आपल्या कामासोबत असल्यामुळे त्यांना त्यांची अशी ओळख निर्माण झाली होती जी त्यांचा नवरा, त्यांचे कुटुंब या क्षितिजाच्या पलीकडची होती. ही स्त्री शक्ती प्रबोधनाची पहिली पायरी आहे असे वाटते. जिला स्वतःची ओळख निर्माण झाली आहे तिलाच आपण पुढची प्रबोधनाची पायरी दाखवू शकतो. जिथे अश्याप्रकारे आपण आपल्या कामाच्या माध्यमातून पोहोचलेलो नाही तिथे अजूनही महिला आपले एकल अशी स्थिती सांगायला

ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

कचरतात.

**टेबल क्र ३ : एकल महिला कोठे राहतात**

| क्र | राहण्याची जागा | एकल महिलांची संख्या |
|---|---|---|
| १ | पालकांचे घर | ३९ |
| २ | सासर | ८८ |
| ३ | स्वतंत्र घर | ३७ |
| ४ | अन्य | ३४ |
| | **एकूण** | **१९८** |

** या महिला सासर आणि माहेर अशी ये जा करीत राहतात किंवा त्यांना त्यांची राहण्याची जागा सांगायची नाहीये.

**टेबल क्र ४ : वयानुसार सारिणी**

| क्र | वय | संख्या |
|---|---|---|
| १ | १६-२५ | १० |
| २ | २६-३५ | ३५ |
| ३ | ३६-४५ | ५१ |
| ४ | ४६-५५ | ४५ |
| ५ | ५६-६५ | ३८ |
| ६ | ६६+ | ७ |
| ७ | प्रतिसाद नाही | १२ |
| | **एकूण** | **१९८** |

- १२ जणी उत्तर देऊ शकल्या नाहीत कारण त्यांची जन्मतारीख त्यांना माहित नाही. कोणालाही ते गरजेचे वाटले नाही! त्यांचे कुटुंब आणि समाजासाठी त्यांचे अस्तित्वच कसे महत्वाचे नाही हेच यातून समजते.

**टेबल क्र ५ : शिक्षण**

| क्र | शिक्षण | संख्या |
|---|---|---|
| 1 | १ली ते ४थी | १५ |
| 2 | ५वी ते ७वी | ३० |
| 3 | ८वी ते १० वी | २५ |
| 4 | ११वी ते १२वी | ४ |
| 5 | १२+ | १ |
| | प्रतिसाद नाही | १२३ |
| | **एकूण** | **१९८** |

- मोठ्या संख्येने ३/४ शिक्षणाबद्दल काहीच सांगितले नाही. याचा अर्थ त्या शाळेची पायरी कधीही चढल्या नाहीत असे अनुभव सांगतो.
- शिक्षणाच्या अभावामुळे त्यांना आजूबाजूच्या घडामोडींची माहिती नाही. महिलांचे हक्क आणि त्यांची आजची स्थिती यावरही काहीच

माहिती नाही. बऱ्याचवेळा त्यांच्या स्थितीसाठी त्या नशिबाला बोल लावतात आणि आपल्या हक्कांसाठी काही करावे लागेल हे त्यांच्या गावीही नसते

**टेबल क्र ६ : जमिनीवरील मालकीहक्क**

| क्र | जमिनीवरील मालकीहक्क | संख्या |
|---|---|---|
| १ | हो | ५० |
| २ | नाही | १०३ |
| ३ | प्रतिसाद नाही | ४५ |
| | **एकूण** | **१९८** |

- जमिनीवरील हक्क हे त्यांच्या आर्थिक स्थिती आणि मालमत्तेची मालकी याविषयीचे महत्वाचे निकष आहेत. त्या सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या अत्यंत दुर्बल अश्या आहेत आणि त्यामुळेच खूप कमी महिलांच्या नावावर कोणतीही संपत्ती असलेली आपल्याला दिसते.
- ज्यांच्या नावावर थोडी जमीन आहे असे दिसते, त्या त्यांच्या सासरी तरी राहतात किंवा स्वतंत्रपणे राहात असताना दिसतात.

**आ : तपशीलवार सर्वेक्षण**

हा सर्वेक्षणाचा दुसरा भाग आहे. यात २४ गावांमधील ५२ महिलांचे सर्वेक्षण झाले. या २४ गावांपैकी १४ गावे हि आधीच्या प्राथमिक सर्वेक्षणात समाविष्ट होती. १० गावे नव्याने आली आहेत. विविध सरकारी योजनांपर्यंत पोहोचताना महिलांना काय काय अडचणी येताहेत हे पाहण्याकरिता हे दुसरे सर्वेक्षण केले.

यामध्ये एका लिखित प्रश्नावलीच्या आधारे आपण ५२ महिलांच्या व्यक्तीशः मुलाखती घेतल्या. वर म्हटल्याप्रमाणे आपण ही प्रश्नावली भरतानाच त्या महिलांना सरकारी कार्यालये, अधिकारी यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी मदत करायला सुरुवात केली आणि विविध योजनांसाठी त्यांचे अर्ज भरले जातील असे पहिले.

**टेबल क्र ७ : एकल महिलांची मासिक बचत**

| क्र. | बचत गटातील मासिक बचत | संख्या |
|---|---|---|
| १ | रु. ५० | ३ |
| २ | रु. १०० | १६ |
| ३ | रु. २०० | ६ |
| ४ | रु. ३०० | १ |
| ५ | रु. ५०० | ३ |
| ६ | रक्कम सांगितली गेली नाही | ६ |
| ७ | बचत गटाच्या सदस्या नव्हत्या | १६ |
| ८ | प्रतिसाद नाही | १ |
| | **एकूण** | **५२** |

ISSN–2277- 8721
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

वरील महिलांचे बचत करण्याचे एकमेव साधन हे महिला बचतगट आहे असे असण्याची शक्यता खूप आहे. त्यांची बँकेत खाती असण्याची शक्यता खूपच कमी दिसते. या भागातील महिलांसाठीचा दिवसाचा रोज हा साधारण रु. १२०/- असा आहे, त्यामुळे जवळजवळ १/३ महिला या एक दिवसाचा रोज हा एका महिन्यामध्ये बचत करताना दिसतात आणि बाकीच्या १/३ जणीचा अजून गटावरील विश्वास तितकासा वाढला नाहीये, त्यामुळे त्यांनी गटात प्रवेश घेतलेला नाहीये असे दिसते.

**टेबल क्र ८ : कर्ज विषयक स्थिती**

| क्र | कर्जविषयक स्थिती | संख्या |
|---|---|---|
| १ | कधीही कर्ज घेतले नाही | २७ |
| २ | गटातून कर्ज घेतले | २३ |
| ३ | कोणताही प्रतिसाद नाही | २ |
| | **एकूण** | **५२** |

- जेंव्हा एखादी महिला कर्ज घेते तेंव्हा छोटासे का होईना पण दिवसाच्या मजुरीच्या, रोजाच्या स्वरूपातील तिचे उत्पन्न हे नक्की असते.
- सरकारी कार्यालयांमधून जाणे आणि एखाद्या योजनेचा फायदा प्रत्यक्ष सुरु होण्यामध्ये कोणकोणत्या अडचणी येतात असे जेंव्हा एकल महिलांना विचारले तेंव्हा खालील गोष्टी लक्षात आल्या.

| क्र | सरकारी कार्यालयांना भेटी देण्याबाबत विचारलेले प्रश्न | हो | नाही | उत्तर दिले नाही |
|---|---|---|---|---|
| १ | एखाद्या सरकारी कार्यालयाला कधी भेट दिली आहे का? | २१ | २८ | ३ |
| २ | सरकारी कार्यालयातील सर्व कर्मचारी पुरुष असल्यामुळे तिथे जायला संकोच वाटतो का? | २९ | १० | १३ |
| ३ | सरकारी योजनेद्वारी काही मिळवण्यासाठी खूप कागदपत्रांची पूर्तता करावी लागते असे तुम्हाला वाटल्यामुळे/माहिती असल्यामुळे तुम्ही सरकारी कार्यालयात जात नाही का ? | ३६ | ७ | ९ |
| ४ | तुमचे शिक्षण खूप कमी झाले आहे याची तुम्हाला कार्यालयात जाण्यासाठी अडचण वाटते का? | ३५ | ६ | ११ |
| ५ | तुम्हाला एकाल महिलांसाठी असलेल्या योजनांचे माहिती नसल्यामुळे त्या मिळत नाहीत असे वाटते का? | ३२ | १४ | ६ |
| ६ | लोक काय म्हणतील या भीतीमुळे सरकारी कार्यालयात जाण्याचा संकोच वाटतो का? | २३ | १९ | १० |
| ७ | कोणी दुसर्या महिलांनी तुम्हाला मदत केली तर तुम्ही सरकारी कार्यालयात जाल का? | ३७ | ६ | ९ |

- पहिल्या प्रश्नाच्या उत्तरावरून असे दिसून येते कि कारण कोणचेही असो ६०% महिला या कोणत्याही सरकारी कार्यालयामध्ये कधीही गेलेल्या नाहीत. पुढील प्रश्नांवरून त्याची कारणेही आपल्याला समजतात.
- राज्य आणि केंद्र सरकारने एकल महिलांच्या मदतीसाठी अनेक योजना सुरु केल्या आहेत, पण त्यातील नेमकेपणाने आपल्याला कोणती योजना लागू होते ही गोष्ट महिलांना माहित नसते. ही मोठीच अडचण ठरते. (प्रश्न ५). या सर्व योजना तालुका पातळीवरील कार्यालयामार्फत महिलांपर्यंत पोहोचतात आणि या कार्यालयांमध्ये बहुतांश पुरुष सदस्य काम करतात त्यामुळे या एकल महिलाना त्यांच्याशी बोलायला संकोच होतो. (प्रश्न २) या महिलांना आपली एकल असण्याची ओळख कोणत्याही पुरुषांपुढे उघड करायची नसते, कारण त्यांना अशी भीती असते, कि त्यांच्या एकल असण्याचा फायदा घेऊन काही गैर गोष्टी घडू शकतात.लोक काय म्हणतील याची भीतीही त्याना वाटत असते, आणि इथेच आपल्यासारख्या सामाजिक संस्थांची भूमिका खूप महत्वाची असते. इथे स्थानिक महिलांची, आपल्या कार्यकर्त्यांची मदत तिला झाली तर ती अत्यंत निश्चिंत मनाने सरकारी कार्यालयात जायला तयार असते.
- तिसऱ्या आणि चौथ्या प्रश्नामधील अडचण ही सर्वात महत्वाची अडचण वाटते. त्यांचे शिक्षणही झालेले नसते त्यामुळे आत्मविश्वासाची पातळी कमी असते. सरकारी कार्यालयातील कागदपत्रांच्या उठाठेवी बद्दल त्यांना माहिती असते, आणि ही उठाठेव आपण करू शकणार नाही हे देखेल माहिती असते. त्यामुळेच इथे आपल्यासारख्या संस्थांची भूमिका आणि मदतीचा हात अत्यंत महत्वाचा ठरतो. या पायरीवर आम्ही वेल्हे तालुक्यात आमच्या कार्यकर्त्यांच्या मदतीने तिला, अर्ज करणे, कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी तिच्या सोबत विविध सरकारी कार्यालयात जाणे, अर्ज भरणे, आणि सरकारी कार्यालयातील अनुधावन करणे यासाठी एका एका प्रकरणासाठी १०-१२ वेळेस खेटे घालून ते काम पूर्ण केले आहे.
- आणखी एक महत्वाची अडचण म्हणजे, त्यांच्या घरांपासून तालुका पातळीवरील कार्यालयाचे असलेले अंतर. यामुळे त्यांना लागणारा वेळ, अत्यंत गरीबीची परिस्थिती असल्यामुळे एस ती साठी लागणारे पैसे, आणि कामासाठी तालुक्याला आल्यावर तिची स्वतः ची जेवणाची सोय, कारण पहाटेच उठून चालत, बसने, जीपने असा प्रवास करीत ती येते. डबा असतोच असे नाही. या सर्व परिस्थितीत आम्ही तिच्या येण्याजाण्याचा खर्चच दिला असे नाही, तर तिच्या जेवणाची सोय देखील केली.

**सर्वेक्षणावर आधारित कृती**

सुरुवातीला जरी ५० एकल महिलांसाठी काम करायचे नियोजन केलेले होते तरी आमचा तळागाळातील संपर्कामुळे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे एकल महिलेची अत्यंत हालाखीची स्थिती लक्षात आल्यामुळे जवळ जवळ २५० महिलांची नावे ही पुढील कार्यवाहीसाठी आमच्याकडे जमा झाली. आमचे सुरवातीचे जे गृहीतक होते त्यापेक्षा या महिलांचे प्रश्न हे खूपच गंभीर होते असे आमच्या लक्षात आले. त्यांना कोणाचाही पाठींबा नसल्यामुळे, समाजाशी लढण्याची ताकत आणि धैर्य त्या एकवटू शकत नव्हत्या. सर्वेक्षणावर आधारित माहितीनुसार, आम्ही ८९ एकल महिलांना विविध सरकारी योजनांसाठी अर्ज दाखल करण्यास मदत केली. प्रक्रिया खूप वेळखाऊ, अवजड आणि विविध पायऱ्यांनी करण्याची असल्यामुळे ती हळू हळू पुढे जाते. आहे. सहामहिन्यात खूप चांगले परिणाम झाले. ४५ महिलांना संजय गांधी निराधार योजना किंवा श्रावण बाल योजने अंतर्गत महिन्याला १००० रुपये असे मिळू लागले आहेत. १० जणीना एक वेळचे विम्याचे रु. २०,०००/- मिळाले आहेत. ह्यापेक्षा महत्वाचे असे, कि असे विविध मेळाव्यामधून एकत्रित येऊन एकमेकींशी बोलण्यामुळे सुद्धा त्यांच्या मनावरील ताण आता हलका झाला आहे.

ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

त्याना खात्यात डाळतांदूळ घेण्याएव्हढे पैसे मिळू लागल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यांनी मोकळा श्वास घ्यायला सुरुवात केली आहे.

**निष्कर्ष**

एकल महिलेला तिची एकल असण्याची स्थिती समाजात चार चौघात सांगणे अवघड जात. आवडत नाही. ती समाजातील सर्वात शेवटच्या पायरीवर उभी असते. समाजाचा ती सर्वात दुर्बल घटक आहे. तिच्या कुटुंबातही ती एकटी असते आणि तिला कोणाचाही पाठींबा नसतो. तिच्या नावावर कोणतीही मालमत्ता नसते. आम्ही ज्या एकल महिलांसोबत काम केले त्या मुख्यतः विधवा होत्या किंवा परित्यक्ता होत्या. त्यांना योग्य ती सरकारी योजना मिळवून देण्यासाठी आम्ही मदत केली. ही प्रक्रिया खूप क्लिष्ट होती पण अशक्य नव्हती.

- २५ गावांमधील ५० एकल महिलांपर्यंत पोहोचण्याच्या आमच्या उद्दिष्टात भर घालून आम्ही ५० गावांतील २५० एकल महिलांपर्यंत पोहोचलो.
- बचतगटाच्या मदतीने आम्ही त्यांची सध्याची स्थिती आणि समाजातील त्यांचे स्थान याचा प्राथमिक आणि तप्शिल्वार्य सर्वेक्षणाच्या माध्यमातून अभ्यास केला.
- वेल्हे तालुक्यामध्ये अश्या एकल महिलांसाठी आम्ही एक मदतीची खिडकी उघडली आणि विविध राज्य आणि केंद्र सरकारच्या योजनांसाठी त्यांनी अर्ज भरावेत यासाठी मदत केली.
- तळागाळापर्यंत संपर्काचे चांगले जाळे असणारया कोणत्याही स्वयंसेवी संस्थेच्या थोड्याशा मदतीमुळे अनेक एकल महिलांच्या आयुष्यावर चांगला प्रभाव पडेल असे काम होऊ शकते, हे प्रबोधिनीच्या उदाहरणावरून दिसते. हे असेच्या असे कोठेही आपण सहजपणे करू शकू.

**संदर्भ**

1. http://www.rightsforsinglewomen.org/Census.html
2. Times of India, July 6, 2015 (Deserted women doesn't need husband's consent for her child's passport, Kerala HC)
3. https://www.thehindu.com/society/is-single-the-new-black-for-indian-women-its-complicated/article22529203.ece
4. Status Single: Truth About Being a Single Woman in India, Sreemour Piu Kundu, Publisher, Amaryllis - an imprint of Manjul Publishing House, 2018
5. The Wire: Prachi Salve, Gender, 14/Nov/2015, https://thewire.in/gender/71-million-single-women-39-rise-over-a-decade
6. Kanchan Gandhi paper India Exclusion Report, P. 165, Kanchan Gandhi et. al., Research Gate, March 2016:https://www.researchgate.net/publication/301339201
7. https://www.firstpost.com/india/single-women-in-himachal-pradesh-deprived-of-their-rights-stripped-of-their-identity-and-left-with-nowhere-to-go-4184097.html
8. Mukhopadhyay,Int. Res. J. Social Sci.Vol.5 (10). 1-5, October (2016), http://www.isca.in/IJSS/Archive/v5/110/1.ISCA-IRJSS-2016-092.pdfh

ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

9. https://www.thehindu.com/news/national/good-news-for-single-women-in-12th-plan/article3867569.ece
10. Dr. Anjuli Chandra, International Journal of Social and Economic Research Vol. 1, Issue.1. January-June 2011 pp. 124-132

***Cite This Article:***

**श्रीमती** बागेश्री पोंक्षे **व श्रीमती** आशा सुर्वे, ***(2022).*** ग्रामीण एकल महिलांची स्थिती : वेल्हे तालुका, जिल्हा पुणे येथील महिलांचा अभ्यास, ***Electronic International Interdisciplinary Research Journal***, *XI (III) May-June, 32-42.*